# घनकचरा नियम न पाळल्यास नवीन बांधकामांवर बंदी

## उच्च न्यायालयाचा पुणे महापालिकेला अंतिम इशारा; उत्तरासाठी दोन दिवसांची मुदत

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. ३१ : पुणे महापालिका आपल्या डंपिंग ग्राउंडबाबत घनकचरा व्यवस्थापन नियमांचे पालन करणार का, कशा प्रकारे करणार ते परवापर्यंत सांगा; अन्यथा पुण्यात नव्या बांधकामांवर बंदी घालू, असा अंतिम इशारा उच्च न्यायालयाने सोमवारी दिला.

या विषयावर विनीत धांडा यांनी सादर केलेल्या जनहित याचिकेवरील सुनावणी न्या. अभय ओक व न्या. व्ही. एल. अचलिया यांच्यासमोर झाली. महापालिका शहरातील कचऱ्याची विल्हेवाट शास्त्रशुद्ध पद्धतीने लावत नाही. या संदर्भातील घनकचरा व्यवस्थापन नियम पाळणे बंधनकारक असूनही ते पाळले जात नाहीत. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते, तसेच पर्यावरणावरही वाईट परिणाम होऊ शकतात. त्यामुळे हे नियम पाळण्याचा आदेश महापालिकेला देण्याची मागणी याचिकेत करण्यात आली आहे.

### परवाना शुल्कावर परिणामाची भीती

**पुणे महापालिकेच्या हद्दीत होणाऱ्या बांधकामांमुळे पालिकेला बांधकाम परवाना शुल्कापोटी वर्षाकाठी जवळपास साडेसातशे कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते. मात्र, आता बांधकामांवर बंदी घातल्यास या उत्पन्नावर मोठा परिणाम होण्याची भीती आहे. त्यामुळे या प्रश्नावर पालिकेला तोडगा काढावा लागणार आहे.**

महापालिकेने या संदर्भातील नियमांचे पालन करावे; अन्यथा नव्या बांधकामांवर बंदी घालू, असा इशारा खंडपीठाने दोन आठवड्यांपूर्वी दिला होता. तरीही या संदर्भात महापालिका ठोस हमी देऊ शकली नाही. त्यामुळे खंडपीठाने महापालिकेला फैलावर घेतले. केव्हातरी अशा प्रकारांना जोरदार दणका दिलाच पाहिजे. तुम्ही चारपर्यंत एफएसआय देता; पण अशा मूलभूत सोयी पुरवीत नसाल, तर त्याचा उपयोग काय? त्यामुळे असा कठोर आदेश दिल्याशिवाय काहीही होणार नाही, अशी तंबी खंडपीठाने दिली.

ज्या डंपिंग ग्राउंडवर घनकचरा व्यवस्थापनाचे नियम पाळले जात नसतील व ज्या डंपिंग ग्राउंडची रचना नियमांनुसार नसेल, ती तीन महिन्यांत बंद करावीत, असा आदेश उच्च न्यायालयाने दोन एप्रिल २०१३ रोजी दिला होता. त्या आदेशाचे पालन करणार की नाही व कशा प्रकारे करणार हे परवापर्यंत सांगावे; अन्यथा हे सांगेपर्यंत महापालिकेने नवी बांधकामे सुरू करण्यास परवानगी देऊ नये, असेही न्यायालयाने बजावले.